दैनिक
महिला संवाद
MAHILA SANVAD

आवृत्ती : पुणे | PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 | इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड | Price 2 Rs, Pages - 4 | किंमत २ रु. | पाने ४

PUNE : Volume No. 2, Issue No. 73, Marathi Daily Thursday, Date - 29 October 2026

पुणे अवृत्ती | वर्ष २ रे | अंक ७३ वा | मराठी दैनिक | गुरूवार दि. २९ ऑक्टोबर २०२६

दोन तरुणांचा अपघातात मृत्यू

अमरावती । प्रतिनिधी

विदर्भात घडलेल्या दोन दुर्दैवी घटनांमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. अमरावती-नागपूर महामार्गावर भरधाव प्रवासी वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. तर भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात शाळेच्या छतावर कबड्डीचा सराव करताना उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीचा धक्का बसलेल्या १४ वर्षीय विद्यार्थ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दोन्ही घटनांमुळे नागरिकांमधून हळहळ व्यक्त होत आहे.

अमरावती-नागपूर महामार्गावरील तिवसा तालुक्यातील वरखेड फाट्यानजीक दुचाकी आणि प्रवासी वाहनाचा भीषण अपघात झाला. नागपूरच्या दिशेने किंवा अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव प्रवासी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या दुर्घटनेत निखिल बोके आणि कैलास कळंबे या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, दोघेही उंबरखेड येथील रहिवासी होते. तिवसा येथून आपल्या गावी परतत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. अपघाताची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी प्रवासी वाहनाच्या चालकाला ताब्यात घेतले असून, अपघाताच्या कारणांचा पुढील तपास सुरू आहे.

कैलास यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांची पत्नी आठ महिन्यांची गर्भवती असून, पुढील महिन्यात बाळाचा जन्म होणार होता. मात्र, बाळाच्या जन्माआधीच त्याच्या डोक्यावरील पित्याचे छत्र हरपले. या घटनेमुळे उंबरखेड गावात शोककळा पसरली असून, नातेवाइकांसह ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

पाहिजेत

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

लाच घेताना आयकर निरीक्षक जाळ्यात
सरकारी कार्यालयांतील लाचखोरी पुन्हा चर्चेत

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सरकारी कार्यालयांमध्ये लाचखोरीच्या घटना सातत्याने समोर येत असताना मुंबई आणि नाशिक जिल्ह्यातील येवला येथे दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये अधिकाऱ्यांना पकडण्यात आले आहे. मुंबईत बेनामी मालमत्तेशी संबंधित प्रकरण मिटवण्यासाठी २० लाख रुपयांची लाच मागून तडजोडीनंतर १५ लाख रुपये स्वीकारल्याप्रकरणी आयकर निरीक्षकाला केंद्रीय अन्वेषण विभागाने अटक केली. दुसरीकडे, येवला येथे १ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताना एका तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. या दोन्ही घटनांमुळे सरकारी यंत्रणेतील लाचखोरीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

मुंबईतील आयकर विभागात कार्यरत असलेल्या एका निरीक्षकावर बेनामी मालमत्तेशी संबंधित प्रकरण बंद करण्यासाठी २० लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. संबंधित प्रकरणातून सुटका करून देण्याच्या मोबदल्यात ही रक्कम मागण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर तडजोड होऊन १५ लाख रुपये स्वीकारण्याचे ठरले.

या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने संबंधित अधिकाऱ्याला पकडण्यासाठी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारण्याच्या वेळी पथकाने कारवाई केली. यावेळी १५ लाख रुपये स्वीकारताना आयकर निरीक्षकाला रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. या कारवाईमुळे आयकर विभागातील कथित लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आले असून, संबंधित अधिकाऱ्याने आपल्या पदाचा गैरवापर करून आर्थिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला का, याचा तपास केला जात आहे.

आयकर निरीक्षकाला अटक केल्यानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाच्या पथकाने त्याच्या घराची झाडाझडती घेतली. या तपासादरम्यान ११ लाख रुपयांची रोकड आणि काही महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेली रोकड आणि कागदपत्रांचा संबंधित प्रकरणाशी काही संबंध आहे का, याची पडताळणी तपास यंत्रणेकडून केली जात आहे. संबंधित आयकर निरीक्षक मुंबईतील स्किंडिया हाऊस येथील आयकर विभागाच्या तपास विभागात कार्यरत असल्याची माहिती आहे.

थोडक्यात...

झाडे वाचवा, सृष्टी वाचवा; संतोष आवटी यांचे पर्यावरण संवर्धनाचे आवाहन

सोयगाव । प्रतिनिधी

प्राणवायू आणि माणूस वाचवा,' असा संदेश संतोष आवटी (पेंटर), टेंभुर्णी, ता. जाफराबाद, जि. जालना यांनी दिला आहे. संत तुकाराम महाराजांनी 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरें' या अभंगातून निसर्गाशी असलेले नाते स्पष्ट केले आहे. मात्र, वाढत्या सिमेंटच्या जंगलामुळे वृक्षतोड वाढत असून पर्यावरणाचा समतोल धोक्यात येत आहे. माणूस स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्ग नष्ट करतो, पण झाडे तोडणे म्हणजे स्वतःच्या जीवनाचा आधार नष्ट करणे होय. झाडांमुळे प्राणवायू, पक्षी आणि प्राण्यांचे अस्तित्व टिकते. भगवान बुद्धांच्या शिकवणीतही निसर्गाबद्दल आदर आणि सहजीवनाचा विचार आहे. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षलागवड करून झाडांचे संगोपन करावे आणि भावी पिढ्यांसाठी सृष्टी सुरक्षित ठेवावी.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

सोयगाव । प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुला मुलींना मार्गदर्शन करण्यात आले तसेच राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत मुला मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमा अंतर्गत मुला मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम वैद्यकीय अधिकारी सौ. शितल डोके, औषध निर्माता आकाश चावरे यांची उपस्थिती होती. आरकेएसके चे अतुल मुळे यांनी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या. दरम्यान राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त सोयगाव तालुक्यात २७ ऑक्टोबरला १ ते १९ वयोगटातील बालकांना जंतनाशक औषध देण्याची मोहीम राबविण्यात आली. वंचित बालकांसाठी तीन नोव्हेंबरला मॉप-अप दिन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गितेश चावडा यांनी दिली.

मनपा मुर्गी तलाव शाळेत राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा, मुर्गी तलाव येथे राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना अल्बेंडाज़ोल या जंतनाशक गोळ्या निशुल्क दिल्या.

यावेळी डॉ. प्रशांत कानडे(वैद्यकीय अधिकारी) मार्गदर्शन करताना म्हणाले की जंताच्या प्रादुर्भावामुळे मुलांना कुपोषण आणि रक्तक्षय होऊन त्यांना सतत थकवा जाणवतो, त्यांची शारीरिक वाढ व मानसिक विकास पूर्णतः होत नाही.नीता गुढेकर (स्टाफ नर्स) यांनी जंताचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय सांगितले, रवि गायकवाड (एम पी डब्ल्यू), ज्योती तांबट (आशा वर्कर), यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या.

जाहीर प्रगटन

दैनिक महिला संवाद मध्ये छोटया जाहिराती आणि पॅनल जाहिराती फक्त 300 रुपयात

प्रसिद्ध करण्यात येतील :
- जाहीर प्रगटन
- पाहिजेत / पाहिजे
- जन्मतारीख बदल
- नावात बदल
- मालमत्ता हस्तांतरण
- खरेदी-विक्री
- स्वरूपाच्या यासंबंधी छोटया जाहिराती

दैनिक महिला संवाद — आपला विश्वास, आमची जबाबदारी

जाहिराती केवळ 300 रुपयात प्रसिद्ध केल्या जातील.

इच्छुकांनी आजच या नंबरवर संपर्क साधावा.

9168567111

निळसर-हिरव्या रंगछटांचा आकर्षक स्थलांतरित पक्षी

फलटण । प्रतिनिधी

फलटण तालुक्यातील माळरान परिसरात युरोपियन रोलर (European Roller) या आकर्षक स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली आहे. निळसर-हिरव्या रंगांच्या आकर्षक पिसाऱ्यामुळे ओळखला जाणारा हा पक्षी पक्षीनिरीक्षकांसाठी उत्सुकतेचा विषय ठरला आहे. या पक्ष्याचे शास्त्रीय नाव डीरलळरी सर्ररीश्रीी असे आहे.

युरोप, पश्चिम आशिया आणि मध्य आशियातील काही भाग हे या पक्ष्याचे प्रमुख प्रजनन क्षेत्र आहे. प्रजननानंतर हिवाळा घालवण्यासाठी हा पक्षी आफ्रिकेकडे स्थलांतर करतो. या प्रवासादरम्यान भारतातील काही भागांत त्याचे दर्शन घडू शकते. महाराष्ट्रात युरोपियन रोलर तुलनेने दुर्मीळ स्थलांतरित पक्षी मानला जातो.

महाराष्ट्रात सामान्यपणे आढळणारा इंडियन रोलर आणि युरोपियन रोलर यांच्यात रंगछटा व पिसाऱ्याच्या रचनेत फरक दिसून येतो. इंडियन रोलरच्या छातीवर तपकिरी-जांभळट छटा ठळक असतात, तर युरोपियन रोलरच्या डोक्यावर व छातीवर निळसर-हिरव्या रंगछटा दिसतात. त्याच्या पाठीवरील तांबूस-तपकिरी रंगही ओळख पटविण्यास मदत करतो. मात्र, पक्ष्याची अचूक ओळख निश्चित करण्यासाठी शरीरावरील विविध खुणा आणि छायाचित्रांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

युरोपियन रोलर प्रामुख्याने कीटकांवर उपजीविका करतो. त्यामुळे पर्यावरणातील कीटकांचे नैसर्गिक संतुलन राखण्यास मदत होते. स्थलांतरित पक्ष्यांना अनुकूल अधिवास उपलब्ध राहण्यासाठी मोकळी माळराने, गवताळ प्रदेश आणि शेती परिसराचे संवर्धन करणे आवश्यक आहे.

फलटण तालुक्यातील माळरान परिसरात या पक्ष्याचे दर्शन झाल्याची नोंद पक्षीनिरीक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरू शकते. या पक्ष्याची अचूक ओळख आणि स्थानिक नोंदींची पुष्टी झाल्यास महाराष्ट्रातील स्थलांतरित पक्ष्यांच्या अभ्यासासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध होऊ शकते.

मानवत येथील पीएमश्री जिल्हा परिषदेच्या मैदानावर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न

मानवत । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत परभणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व

पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विभागीयस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धात श्रीमती सरस्वतीबाई भाले पाटील माध्यमिक विद्यालयाच्या १४ वर्षा खालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामन्यात बीड जिल्ह्याच्या संघावर २-० अशा सरळ डावांनी मात करत संघाने दिमाखदार विजय मिळविला. या स्पर्धे चे उद्घाटन मुख्याध्यापक माणिक घाटुळ शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विलास बारहाते व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी क्रीडा अधिकारी मिलिंद साळवे क्रीडा शिक्षक गुलाब

लाड,गोविंद जोशी होते.पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या मैदानावर प्रथमच विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न झाल्या.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सुनिलकुमार तोष्णीवाल, संस्थेचे अध्यक्ष ड. मुंजाजी भाले पाटील, मुख्याध्यापक आनंदकुमार नांदगांवकर, केंद्रप्रमुख पृथ्वीराज धर्मे, क्रीडाशिक्षक ज्ञानेश्वर रेंगे, तालुका क्रीडा संयोजक श्री. किशन भिसे, ज्ञानेश्वर ठोंबरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघाचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दापोलीतील वराडकर-बेलोसे महाविद्यालयात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांना औषधवाटप

दापोली । प्रतिनिधी

राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत एन. के. वराडकर कला व आर. व्ही. बेलोसे वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आरोग्य मार्गदर्शन आणि जंतनाशक औषधवाटप उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी प्रा. बिभीषण ढवळे यांनी जंतसंसर्गाची कारणे, त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि प्रतिबंधात्मक उपाय यांची माहिती दिली. वैयक्तिक स्वच्छता राखणे, स्वच्छ पाणी पिणे, अन्नपदार्थ स्वच्छ ठेवणे तसेच जेवणापूर्वी आणि शौचालयाचा वापर केल्यानंतर हात धुण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

उपजिल्हा रुग्णालय, दापोली येथील आरोग्य सेवक वैभव रामचंद्र जाधव आणि सतीश सीताराम पवार यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून मार्गदर्शन केले. जंतनाशक औषधांचा योग्य वापर आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार औषधे घेण्याचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

संस्थेचे कार्यवाह डॉ. दशरथ (काका) भोसले आणि प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशक औषधांचे वाटप करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक लक्ष्मीकांत पाटील, प्रा. बिभीषण ढवळे, युवराज आग्रे आणि मानसी कोवळे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राखणे, जंतसंसर्गाचे प्रमाण कमी करणे आणि स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

अमली पदार्थ तस्करांना पकडण्यासाठी धावले, पण हृदयविकाराच्या झटक्याने प्राण गमावले

पिंपरी । प्रतिनिधी

शहरातील अमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी कारवाई करत असताना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकातील हवालदार जावेद बागसिराज यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. रविवारी (२५ ऑक्टोबर) रात्री संत तुकारामनगर परिसरात ही दुर्दैवी घटना घडली. अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या संशयितांना पकडण्यासाठी पोलिसांनी सापळा रचला होता. यावेळी एका संशयिताला पकडल्यानंतर पळून जाणाऱ्या दुसऱ्या संशयिताचा पाठलाग करताना जावेद यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस दलात शोककळा पसरली आहे.

संत तुकारामनगर परिसरात दोन संशयित मेफेड्रॉन या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती हवालदार जावेद बागसिराज यांना मिळाली होती. त्यांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतर अमली पदार्थविरोधी पथकाने संबंधित परिसरात सापळा रचला.

पोलिसांची चाहूल लागताच संशयितांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी पथकाने एका संशयिताला पकडले; मात्र त्याचा दुसरा साथीदार अंधाराचा फायदा घेत पळू लागला. त्याला पकडण्यासाठी जावेद यांनी धाडसाने पाठलाग सुरू केला. मात्र, धावत असतानाच त्यांच्या छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या आणि ते जमिनीवर कोसळले.

जावेद यांची प्रकृती अचानक बिघडल्याचे लक्षात येताच सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांना पुन्हा हृदयविकाराचा

तीव्र झटका आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

जावेद बागसिराज हे २०१० मध्ये पुणे शहर पोलीस दलात भरती झाले होते. सुरुवातीची आठ वर्षे त्यांनी हडपसर आणि मुंढवा पोलीस ठाण्यांत सेवा बजावली. २०१८ मध्ये स्वतंत्र पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाल्यानंतर ते या पोलीस दलात रुजू झाले. पिंपरी पोलीस ठाण्यात सेवा बजावल्यानंतर त्यांची गुन्हे शाखेत नियुक्ती करण्यात आली. सध्या ते अमली पदार्थविरोधी पथकात कार्यरत होते.

जावेद यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, बारा वर्षांची मुलगी आणि सात वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने बागसिराज कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

सोमवारी (२६ ऑक्टोबर) पुण्यातील कसबा पेठ येथील कब्रस्तानात त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अमली पदार्थांविरोधातील कारवाईदरम्यान कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या या पोलीस कर्मचाऱ्याच्या निधनाबद्दल पोलीस दलातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

संपादकीय...

लाचखोरीने प्रशासन बदनाम

सरकारी कार्यालये म्हणजे सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणारी, त्यांच्या अडचणी सोडवणारी आणि शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवणारी यंत्रणा. मात्र, याच यंत्रणेतील काही अधिकारी आणि कर्मचारी आपल्या अधिकारांचा वापर जनसेवेसाठी करण्याऐवजी वैयक्तिक आर्थिक लाभासाठी करीत असतील, तर ही बाब केवळ भ्रष्टाचाराची राहत नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासाला तडा देणारी ठरते. मुंबईत १५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना आयकर निरीक्षकाला झालेली अटक आणि नाशिक जिल्ह्यातील येवला येथे १ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताना तलाठ्याविरुद्ध झालेली कारवाई या घटनांनी पुन्हा एकदा प्रशासकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे. मुंबईतील प्रकरणात बेनामी मालमत्तेशी संबंधित प्रकरण मिटवण्यासाठी २० लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तडजोडीनंतर १५ लाख रुपये स्वीकारताना संबंधित आयकर निरीक्षकाला केंद्रीय अन्वेषण विभागाने पकडले. त्याच्या घराच्या झाडाझडतीत ११ लाख रुपयांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. दुसरीकडे, येवला येथे अवघ्या १ हजार ५०० रुपयांच्या लाचप्रकरणी तलाठ्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. या दोन्ही घटनांमधील रकमेतील फरक मोठा असला, तरी दोन्ही प्रकरणे प्रशासनातील नैतिकतेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधतात. सरकारी पदावर बसलेल्या व्यक्तीने आपल्या अधिकारांचा वापर नागरिकांच्या हितासाठी करायचा की स्वतःच्या फायद्यासाठी, हा मूलभूत प्रश्न आहे. लाचखोरीचा सर्वाधिक फटका सामान्य माणसाला बसतो. एखाद्या शेतकऱ्याला सातबारा उतारा, फेरफार नोंद किंवा जमिनीशी संबंधित कामासाठी तलाठी कार्यालयात जावे लागते. एखाद्या नागरिकाला दाखला, परवानगी, शासकीय प्रमाणपत्र किंवा अन्य सेवा मिळवण्यासाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. अशा वेळी नियमांनुसार होणारे काम विनाकारण प्रलंबित ठेवून पैशांची मागणी केली जात असेल, तर नागरिकाची आर्थिक आणि मानसिक पिळवणूक होते. ज्याच्याकडे पैसे देण्याची क्षमता नाही, त्याचे काम किती दिवस रखडणार? आणि ज्याने पैसे दिले नाहीत, त्याला आपल्या हक्काच्या सेवेसाठी किती संघर्ष करावा लागणार? शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यावसायिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबांसाठी शासकीय कार्यालयातील प्रत्येक चकरा वेळ आणि पैशांचा अपव्यय करणाऱ्या असतात. त्यातच लाचेची मागणी झाली, तर आधीच अडचणीत असलेल्या नागरिकांच्या समस्यांमध्ये भर पडते. शासनाने नागरिकांच्या सेवेसाठी उभारलेली यंत्रणा जर नागरिकांवरच आर्थिक भार टाकू लागली, तर प्रशासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जातो.

रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य; तरीही टोलवसुलीचा धडाका

रेवदंडा । प्रतिनिधी

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्याप पूर्णत्वास गेलेले नसताना टोलवसुली मात्र जोरात सुरू असल्याने प्रवाशांच्या संतापाचा उद्रेक होऊ लागला आहे. याच संतापाचे पडसाद खारपाडा टोलनाक्यावर उमटले असून, रविवारी रात्री प्रवासी आणि टोल कर्मचारी यांच्यात जोरदार हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर महामार्गावरील टोलवसुलीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. चित्रफितीत दोन्ही बाजूंचे लोक एकमेकांना मारहाण करताना, तसेच लाठ्या-काठ्यांचा वापर होताना दिसत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, हा वाद नेमका कोणत्या कारणावरून झाला, याची अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला २०११ मध्ये सुरुवात झाली. हे काम २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, २०२६ साल उजाडले तरी महामार्गाच्या कामाला पूर्णविराम मिळालेला नाही. वर्षानुवर्षे रखडलेले काम, अपुऱ्या सुविधा, निकृष्ट रस्त्यांचे आरोप आणि जागोजागी पडलेले खड्डे यांचा त्रास सहन करत प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. अशा परिस्थितीत टोलवसुली सुरू झाल्याने नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.प्रवाशांना सुरक्षित, दर्जेदार आणि खड्डेमुक्त रस्त्याची सुविधा मिळणार कधी? महामार्गाचे काम पूर्ण होण्यास विलंब होत असताना टोलवसुलीची घाई नेमकी कशासाठी? अपूर्ण कामे आणि उपलब्ध सुविधांचा विचार करून टोलवसुलीचे नियम लागू केले आहेत का? असे सवाल आता उपस्थित होत आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींनीही टोलवसुली थांबवण्याची मागणी केल्याचे सांगितले जात असताना प्रत्यक्षात वसुली सुरूच असल्याने नाराजी

अधिक तीव्र झाली आहे.

वडखळ बायपासकडून पुलाखालून अलिबागच्या दिशेने जाणाऱ्या ब्लॉकच्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून केल्या जात आहेत. या मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. रस्त्याचे काम अपूर्ण आणि प्रवास खडतर असताना वाहनचालकांकडून टोल मात्र आकारला जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.टोल भरूनही खड्ड्यांतून मार्ग काढायचा, वाहनांचे नुकसान सहन करायचे आणि अपघाताचा धोका पत्करायचा; मग टोलच्या बदल्यात प्रवाशांना नेमकी कोणती सुविधा मिळत आहे, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. रस्त्याची सद्यस्थिती, अपूर्ण कामे आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची तपासणी करून संबंधित यंत्रणांनी वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी होत आहे.

खारपाडा टोलनाक्यावरून प्रवास करणाऱ्या स्थानिक वाहनचालकांमध्येही टोलसवलतीबाबत संभ्रम आणि नाराजी असल्याची चर्चा आहे. स्थानिक वाहनांना टोलमाफी किंवा सवलत लागू आहे का, असल्यास कोणत्या गावांतील वाहनांना, कोणत्या अटींवर आणि कोणत्या प्रकारच्या वाहनांना ती मिळते, याची स्पष्ट माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी पुढे येत आहे. स्थानिक पास, मासिक पास, सवलतीचे नियम आणि पात्रतेच्या अटी टोलनाक्यावर ठळकपणे प्रदर्शित केल्या जातात का, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे. टोलवसुली नियमांनुसार होत असेल, तर त्याचे अधिकृत आदेश, लागू केलेल्या अटी आणि सवलतींचे निकष जनतेसमोर मांडण्यास हरकत काय? तसेच नियमबाह्य वसुली झाल्याची तक्रार असल्यास तिची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र, टोलवसुली चुकीचीच आहे, असा निष्कर्ष अधिकृत तपासणीपूर्वी काढता येणार नाही. त्यामुळे संबंधित प्राधिकरणाने नियम आणि वसुलीची वैधता स्पष्ट करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

टोलवसुलीवरून वारंवार वाद निर्माण होत असतील, तर केवळ प्रवासी आणि टोल कर्मचारी यांच्यातील संघर्ष म्हणून या घटनांकडे पाहून चालणार नाही. महामार्गाची सद्यस्थिती, टोलवसुलीचे नियम, स्थानिक वाहनांसाठीच्या सवलती आणि तक्रार निवारणाची व्यवस्था याबाबत स्पष्टता नसल्यास वाद वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचवेळी कोणत्याही कारणावरून मारहाण किंवा लाठ्या-काठ्यांचा वापर समर्थनीय ठरू शकत नाही. खारपाडा येथील घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई होणे गरजेचे आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम कधी पूर्ण होणार, अपूर्ण आणि खराब रस्त्यांची दुरुस्ती कधी होणार, टोलवसुलीचे नियम काय आहेत आणि स्थानिक वाहनांना कोणत्या सवलती लागू आहेत, या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून रस्त्याच्या कामाची सद्यस्थिती, उर्वरित कामांचा कालावधी, सुरक्षा व्यवस्था आणि टोलवसुलीच्या वैधतेबाबत स्पष्ट माहिती द्यावी. टोलवसुली नियमबाह्य असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कारवाई व्हावी; तसेच नियमांनुसार वसुली होत असल्यास त्याची अधिकृत माहिती जनतेसमोर ठेवावी.वर्षानुवर्षे प्रतीक्षा करूनही दर्जेदार महामार्ग मिळत नसेल, तर प्रवाशांनी केवळ टोल भरायचा आणि खड्ड्यांतून प्रवास करायचा का? हा प्रश्न आता प्रशासनाला टाळता येणार नाही. खारपाडा टोलनाक्यावरील हाणामारी ही केवळ दोन गटांतील झटापट म्हणून न पाहता, महामार्गाच्या अपूर्ण कामांमुळे आणि टोलवसुलीबाबत निर्माण झालेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर गांभीर्याने तपासण्याची गरज आहे. जनतेच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधांमध्ये दर्जा, सुरक्षितता आणि पारदर्शकता यांना प्राधान्य मिळालेच पाहिजे.

जंगली कोटा जंगलातून सागवान लाकडांची तस्करी, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे वृक्षप्रेमी करणार तक्रार!

सोयगाव । प्रतिनिधी

वृक्ष संवर्धनासाठी सरकार लाखो रुपये खर्च करीत आहे. त्याच्या कित्येक पटीने वृक्षतोड सर्रास सुरू आहे. पावसाने मारलेली दडी, वाढते तापमान व दुष्काळाच्या झळा सध्या जनता सोसत असताना देखील वृक्षांवर अवैधरित्या कुऱ्हाडी चालवल्या जात असल्याने पर्यावरणाची मोठी हानी होताना दिसत आहे. तर इकडे झाडांच्या तोड सुरू असताना ते रोखणे सरकारचे दायित्व असताना देखील राजकीय दृष्ट्या दुर्लक्ष केले जात आहे.

वाढत्या महागाईत अधिकाऱ्यांची वाढलेली भूक यामुळे जंगल ओसाड पडण्याच्या मार्गावर आहे. पर्यावरणाचा समतोल राहावा यासाठी विविध सामाजिक संस्था, समाजसेवक, वृक्षप्रेमी ,राजकीय नेते ,वनविभाग, झाडे लावा झाडे जगवा यासाठी जनजागृती करीत आहे.

एक पेड मा के नाम असे स्लोगन देत सर्वसामान्य जनतेला वृक्षारोपण करण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे. जंगलाला प्रथम दर्जा देणारे सोयगाव वनविभाग वन परिमंडळ बनोटी येथील प्रभारी वनरक्षक मनगटे यांच्याच कार्यक्षेत्रात जंगलातील सागवान लाकड तोडून मोठ्या प्रमाणात लाकडांची

तस्करी केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार दि.२५ रविवारी उघडकीस आला आहे. जंगलात ठिकठिकाणी कुऱ्हाडीने तोडलेले सागवान झाडांची खोडं स्पष्ट दिसत आहे. यामुळे जंगलाला प्राधान्य देणाऱ्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातच तस्करीच्या घटना घडत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या घटनांमुळे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यावर प्रश्न निर्माण झाले आहे. वनविभागाचे वनरक्षक वनपाल हे कर्तव्य ठिकाणी रहात नसल्याने अवैधरित्या वृक्षांची केली जाणारी तोड रोखण्यात सोयगाव वन विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. लाकूड तस्करांनी वनविभागाच्या जंगलाकडे मोर्चा वळविल्याने जंगलातील सागवान लाकडांची अस्तित्व धोक्यात आले आहे.

यामुळे जंगलातील पशुपक्षी यांच्या आदिवासावर एक प्रकारे घाला घातला जात आहे. अन्नाच्या शोधात गेलेले पशु पक्षी पुन्हा आपल्या घरट्याकडे परततात तेव्हा त्यांना आपली घरटे दिसत नसल्याने जंगलात त्यांची होणारी चिव चिव व घरटे शोधण्यासाठी होणारी धडपड ही वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना कशी कळणार अशी चर्चा बनोटी परिसरात रंगली आहे. जंगलाची देखभाल करणारे रक्षक असलेले वनविभागच सोयगाव तालुक्यात भक्षक असल्याची भावना वृक्षप्रेमी मधून बोलली जात आहे. दि.२३ शुक्रवारी तालुक्यातील जंगली कोटा शिवारात गेल्या तीन-चार दिवसापासून लाकूड तस्करांकडून दुष्काळ परिस्थितीचा फायदा घेत शेतकऱ्यांना आमिष दाखवून डेरेदार वृक्षांची कत्तल केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता.

वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्राधिकारी सोयगाव यांना वृक्षप्रेमींकडून वेळोवेळी माहिती देऊन देखील वनविभागाकडून कारवाई होत नाही. गोपनीय माहिती देणाऱ्यांची नावे ही लाकूड तस्करांना वनविभागाकडून सांगितली जाते त्यामुळे गोपनीय माहिती देणाऱ्या वृक्षप्रेमींच्या जीविताला वनविभाग धोका निर्माण करीत आहे. सोयगाव वन विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांना माहिती देऊन देखील कारवाई केली जात नाही.

सोयगाव तालुक्यात होत असलेल्या वृक्षांच्या अवैद्यरीत्या थोडी विरोधात व सोयगाव वन विभागाच्या वनपरिक्षेत्राधिकारी वन परिमंडळाचे वनपाल गणेश सपकाळ, व वनरक्षक यांच्याविरुद्ध प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास राव यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे वृक्षप्रेमींनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

सोयगाव तालुक्यातील शिंदोळ येथील शिष्ट मंडळाने पुरंदर तालुक्यातील आडाची वाडी गावाची केली पाहणी

सोयगाव । प्रतिनिधी

राज्यात प्रथम आलेल्या पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी या गावाची सोयगाव तालुक्यातील शिंदोळ येथील ग्रामस्थ शिष्ट मंडळाने पाहणी केली. संपूर्ण आडाची वाडी गावाची पाहणी करीत घनकचरा व्यवस्थापन, गावातील स्वच्छता, सांड पाणी, गटारी स्वच्छता, सुसज्ज असे वाचनालय, व्यायाम शाळा समशान भूमी मधील अभ्यास केंद्र आदींची पाहणी केली.

यावेळी आडाची वाडी येथील गावकऱ्यांच्या मते इथे पदाला महत्व नाही गावाचा विकास व गावाला बक्षीस कसे मिळेल यासाठी सर्व गावकरी प्रयत्न करतात. स्वयंसेवी ज्यांनी सगळ्यांनी मिळून गावाला राज्यातून प्रथम क्रमांक मिळवून दिला अशी माहिती आडाची वाडी येथील सागर पवार , अरविंद पवार , सचिन पवार , दत्तात्रय पवार यांनी शिंदोळ येथील योगेश बोरसे, दत्तू पाटील व त्यांच्या सोबत असलेल्या ग्रामस्थांना दिली. आडाची वाडी या गावाचा झालेला विकास बघून शिंदोळ गावाचा विकास आडाची वाडी गावाच्या धर्तीवर करायचा हा उदात्त हेतू मनात घेऊन योगेश बोरसे व त्यांच्या समवेत असलेले शिष्ट मंडळ शिंदोळ गावी परतले यावेळी गावकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

महा कॅम्पा निधीतून व्याघ्र प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाची कामे पूर्ण करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

वनसंवर्धन राखीव क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून त्यांच्या जीवनात आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी कॅम्पाअंतर्गत असलेल्या निधीचा मोठा हातभार लागू शकतो. या निधीच्या उपयोगातून व्याघ्र प्रकल्प आणि इतर संरक्षित क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाची कामे पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

तसेच या निधीतून पूर्ण केलेल्या वनीकरण, मृद व जलसंधारणाच्या कामांची उपग्रह व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पडताळणी करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी आज दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाची (महा कॅम्पा) बैठक झाली. यावेळी आढावा घेताना मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीला दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे वनमंत्री गणेश नाईक उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, कॅम्पाअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची सध्याची पडताळणीची पद्धत बदलून कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यात यावी. पूर्ण झालेल्या वनीकरणाच्या कामांपैकी काही नमुने निवडून त्यांचे सर्वेक्षण करावे. संबंधित यंत्रणांनी मृद व जलसंधारण तसेच वनीकरण कामांकडे गांभीर्याने लक्ष देऊन ही कामे पूर्ण करावीत.

राष्ट्रीय कॅम्पा निधीतून राज्यातील राखीव वनक्षेत्रातील गावांचे टप्प्याटप्प्याने पुनर्वसन करण्यासाठी केंद्राकडे निधीची मागणी करावी. त्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा. राज्यस्तरीय कॅम्पा प्राधिकरणाला मनुष्यबळ उपलब्धतेसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा घेण्यात यावी. राज्याच्या राखीव निधीसाठी रिझर्व बँकेमध्ये खाते उघडण्याची कार्यवाही पूर्ण करावी. या निधीवरील अधिकच्या व्याजासाठी चांगले गुंतवणूक पर्याय निवडून प्रयत्न करावे. राज्याच्या महत्त्वाकांक्षी ३०० कोटी वृक्ष लागवड मोहिमेसाठी या निधीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वनीकरण करावे आणि वनेतर जमीन वनांखाली आणावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सध्या असलेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये या निधीचा उपयोग करीत कुरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा. यामधून चाऱ्याची उपलब्धता आणखी सुनिश्चित करता येईल. बैठकीस वन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, अपर मुख्य सचिव (वित्त) विकासचंद्र रस्तोगी, पर्यावरण सचिव जयश्री भोज, कृषी सचिव परिमल सिंग, ग्रामविकास सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी आणि कॅम्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी याटबोन उपस्थित होते.

पर्यायी वनीकरणाअंतर्गत आतापर्यंत १ लाख ७ हजार ८६५ हेक्टरवर रोपवनाची कामे पूर्ण करण्यात आली.

तसेच २०१९-२० ते २०२५-२६ या कालावधीत ५६२ निवासस्थाने आणि ८३ कार्यालयांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. त्याचप्रमाणे महिलांकरिता ६२ विश्रामगृहे तयार करण्यात आली. कुरण विकास कार्यक्रमांतर्गत १५,७२४ हेक्टर क्षेत्रावर कुरण विकासाची कामे पूर्ण करण्यात आली. या निधीच्या उपयोगातून व्याघ्र प्रकल्प आणि इतर संरक्षित क्षेत्रांमधील ५५ गावांचे पुनर्वसन करण्यात आले.

थोडक्यात

सोयगाव शहरात ठिकठिकाणी कोजागिरी पौर्णिमा उत्साहात

सोयगाव । प्रतिनिधी

उपेक्षित समाजाला प्रेम, आपुलकी आणि योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने टीम समर्पण फाउंडेशन व एकता ग्रुप, भवानीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने एकलव्य नगरात दि.२५ रविवारी कोजागिरी पौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. राजकारणी पाच वर्षातून एकदा येतात; मात्र या समाजाकडे कोण बघणार? त्यांनाही प्रेम आणि आपुलकीची गरज आहे, अशी भावना समर्पण फाउंडेशनचे संस्थापक हर्षल हिंदू यांनी व्यक्त केली. उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ह.भ.प. सुधन्वा महाराज केणेकर यांनी माता शबरीची भक्ती आणि भगवान एकलव्याच्या त्यागावर प्रबोधन केले. त्यानंतर सामूहिक दुग्धपानातून ग्रामस्थांनी एकोप्याचा आणि माणुसकीचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी टीम समर्पण फाउंडेशन व एकता ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे सोयगाव परिसरातून कौतुक होत आहे.

चिंचोलीमध्ये शॉर्टसर्किटमुळे पंधरा एकर ऊस जळून खाक

परतूर । प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचोली येथे सोमवारी(दि.२६)रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागून चार शेतकऱ्यांचा एकूण पंधरा एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत तीन बाधितांच्या १०० पाईपचे नुकसान झाले आहे. स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि अग्निशमन दलाच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र, तोपर्यंत ऊस पिकाचे मोठे नुकसान झाले होते. या घटनेमुळे बाधित शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून, तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

चिंचोली येथील शेतकरी नारायण विठ्ठलराव कातारे (गट क्रमांक १३९), गुलाब देविदास बाहेकर आणि विनोद प्रभाकर चव्हाण(गट क्रमांक १३९ व १३२) यांच्या शेतातील ऊसाला आग लागल्याने एकूण पंधरा एकरांवरील ऊस जळून खाक झाला. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. या आगीत १०० पाईप जळून नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यानंतर अग्निशमन दलानेही घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र, या घटनेत शेतकऱ्यांच्या उभ्या ऊस पिकाचे आणि पाईप साहित्याचे मोठे नुकसान झाले.

ऊस पिकासाठी लागवड, खते, औषधे आणि मशागतीवर मोठा खर्च करावा लागतो. अशा परिस्थितीत उभे पीक आगीत जळून गेल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यातच १०० ते १५० पाईप नुकसान झाल्याने सिंचन व्यवस्थेवरही परिणाम झाला आहे.

संबंधित महसूल व कृषी विभागाने घटनास्थळी भेट देऊन पंधरा एकर ऊस पिकाचा आणि १०० पाईप नुकसानीचा पंचनामा करावा. नुकसानीचे योग्य मूल्यांकन करून शासनाच्या नियमानुसार बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. प्रशासन या घटनेची दखल घेऊन लवकर

लिंकटेनस्टाईनचे राजकुमार अलॉइस, राजकुमारी सोफी आणि शिष्टमंडळाचे आगमन

मुंबई । प्रतिनिधी

लिंकटेनस्टाईनचे राजकुमार अलॉइस आणि राजकुमारी सोफी आणि त्यांच्या शिष्टमंडळाचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे रविवारी रात्री आगमन झाले. यासंगी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख, राजशिष्टाचार विभागाच्या सहसचिव रोहिणी जाधव, मुंबई उपनगरचे अतिरिक्त जिल्हाधिकारी पद्माकर रोकडे उपस्थित होते.

कर्तव्यावर येताना वरिष्ठ पोलीस निरीक्षकाचा मृत्यू

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई पोलीस दलातील कुरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशील कुमार गायकवाड यांचा कर्तव्यावर येत असताना दुर्दैवी मृत्यू झाला. नवी मुंबईतील उलवे येथील राहत्या घरातून ते नेहमीप्रमाणे कामावर येत होते. मात्र, पोलीस ठाण्यात पोहोचण्यापूर्वीच त्यांची प्रकृती बिघडली. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली असून, पोलीस अधिकाऱ्यांवरील कामाचा ताण आणि त्यांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गायकवाड यांनी सोमवारी संध्याकाळी पोलीस उपायुक्त गजानन राजमाने यांचा वाढदिवस साजरा केला होता. त्यानंतर ते उलवे येथील घरी गेले. मंगळवारी सकाळी ते कर्तव्यावर येत असताना प्रवासादरम्यान त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी सोबत असलेल्या चालक आणि सहकाऱ्याला आपली प्रकृती ठीक नसल्याचे सांगितले. तसेच, थोडा वेळ गाडीतच आराम करण्यासाठी उशी मागितली.

कुरार पोलीस ठाण्यात पोहोचल्यानंतर चालकाने त्यांना आवाज दिला. मात्र, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर चालकाने त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला असता त्यांचे शरीर थंड पडल्याचे आणि तोंडातून फेस आल्याचे निदर्शनास आले. चालक आणि सहकाऱ्याने त्यांना तातडीने मालाड येथील पठाणवाडी परिसरातील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचारांपूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

विशेष म्हणजे, याच महिन्याच्या सुरुवातीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी जाधव यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला होता. अवघ्या सात महिन्यांपूर्वी सुशील कुमार गायकवाड आणि शिवाजी जाधव या दोन्ही अधिकाऱ्यांना पोलीस निरीक्षक पदावरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळाली होती. अल्पावधीत दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याने पोलीस दलात चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पोलीस अधिकाऱ्यांवर वाढत असलेला कामाचा ताण आणि वरिष्ठांकडून येणाऱ्या विविध कामांच्या सततच्या सूचना यांमुळे अधिकारी तणावाखाली काम करत असल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या मुख्य जबाबदारीसोबतच हद्दीतील फेरीवाले, विविध पुनर्विकास योजना, महानगर विकास प्राधिकरण, वन विभाग आणि इतर प्रशासकीय कामांचा अतिरिक्त भारही अधिकाऱ्यांवर येत असल्याचे बोलले जात आहे.

या वाढत्या जबाबदाऱ्यांमुळे पोलीस अधिकाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर परिणाम होत आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र, गायकवाड यांच्या मृत्यूमागे कामाचा ताण किंवा वरिष्ठांचा दबाव हेच कारण असल्याचे अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट झालेले नाही.

पोलीस अधिकाऱ्यांच्या कामाच्या वेळा, पुरेशी विश्रांती, सुट्ट्या आणि आरोग्य तपासणी यांसारख्या मुद्द्यांवर या घटनेमुळे पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. कर्तव्य बजावताना अधिकाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

यायालयीन काम आटोपून घरी परतताना काळाचा घाला; दोन तरुणांचा मृत्यू

धुळे । प्रतिनिधी

धुळे शहराजवळील बोरविहिर गावानजीक टोलनाक्याच्या परिसरात झालेल्या भीषण अपघातात मोरदड येथील दोन चुलत भावांचा मृत्यू झाला. रात्रीच्या सुमारास दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकीने ट्रॅक्टरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत विनोद शामा बागुल यांचा जागीच मृत्यू झाला, तर सामाजिक कार्यकर्ते सागर काशिनाथ बागुल यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे मोरदड गावासह संपूर्ण धुळे तालुक्यात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विनोद बागुल आणि सागर बागुल हे दोघे चुलत भाऊ न्यायालयीन कामकाजासाठी धुळे शहरात आले होते. काम आटोपल्यानंतर ते दुचाकीवरून आपल्या गावाकडे परतत होते. याचदरम्यान बोरविहिर गावाजवळील टोलनाक्याच्या परिसरात त्यांच्या दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि दुचाकी ट्रॅक्टरला पाठीमागून धडकली.

या अपघातात विनोद शामा बागुल यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या सागर काशिनाथ बागुल यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

एकाच कुटुंबातील दोन तरुणांचा अपघातात मृत्यू झाल्याची बातमी समजताच मोरदड गावात शोककळा पसरली. नातेवाईक आणि मित्रपरिवाराने रुग्णालयात गर्दी केली होती. दोन तरुणांच्या अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या अपघातास कारणीभूत ठरलेल्या ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघात नेमका कसा घडला, याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

कर्जतमधील वृक्षतोडीला विरोधाची धार वाढली; प्रकल्प दुसरीकडे उभारण्याची मागणी

रायगड । प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर, कोतवाल आणि खलाटी परिसरात गुजरातमधील टॉरंट पॉवर कंपनीचा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी ३२ हजारांहून अधिक झाडांची कत्तल होण्याची शक्यता असल्याने पर्यावरणप्रेमी, विरोधक आणि स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. महाविकास आघाडीनंतर आता सत्तेतील राष्ट्रवादी काँग्रेसनेही या वृक्षतोडीला विरोध दर्शवला आहे. हा प्रकल्प मराठवाड्यात उभारण्याचा पर्याय तपासावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी प्रस्तावित प्रकल्पासाठी होणाऱ्या वृक्षतोडीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. एका बाजूला वृक्षलागवडीचे आवाहन केले जाते, तर दुसऱ्या बाजूला हजारो झाडे तोडली जातात, ही बाब योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले.

सध्या महाराष्ट्रातील अनेक भागांना दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत निसर्गाची हानी टाळणे आवश्यक आहे. कर्जत परिसरातील जुन्या वृक्षांची कत्तल करण्याऐवजी हा प्रकल्प अन्य ठिकाणी उभारता येईल का, याचा विचार सरकारने करावा. मराठवाड्यात हा प्रकल्प राबवता येतो का, याची शक्यता तपासावी. त्यामुळे पर्यावरणाची हानी टाळता येऊ शकते, अशी भूमिका चव्हाण यांनी मांडली.

प्रकल्प अन्यत्र हलवण्याची सरकारकडे विनंती करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पक्षाचा प्रवक्ता आणि निसर्गप्रेमी म्हणून आपण या वृक्षतोडीला विरोध करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पावरून परिसरातील वातावरण तापले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे उद्या या परिसराला भेट देणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे या प्रकल्पाविरोधातील आंदोलनाला आणखी बळ मिळण्याची शक्यता आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींकडूनही वृक्षतोड रोखण्याची मागणी केली जात आहे.

दरम्यान, राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी अजितदादांच्या विमान अपघाताच्या तपासावरूनही प्रश्न उपस्थित केले. उद्या या अपघाताला तीन महिने पूर्ण होत असून, तपास नेमका कुठपर्यंत आला, याबाबत त्यांनी सरकारकडे स्पष्टीकरण मागितले.

या प्रकरणाचा तपास लवकर पूर्ण करून अहवाल सादर करावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

पत्नीच्या धाकट्या बहिणीशी विवाह केला, कौटुंबिक वादातून जावयाचा खून

सोलापूर । प्रतिनिधी

पत्नीच्या धाकट्या बहिणीशी विवाह केल्याच्या वादातून जावयाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात उघडकीस आली आहे. किसन गडहिरे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. कौटुंबिक वादातून घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवेढा पोलीस या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, विवाहानंतर किसन गडहिरे यांनी पत्नीच्या धाकट्या बहिणीला उच्च शिक्षणासाठी आपल्या घरी आणले होते. याच काळात किसन आणि त्यांच्या मेव्हणीमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्याचे सांगितले जाते. पुढे दोघांनी विवाह करण्याचा निर्णय घेतला. मात्र,

या निर्णयाला किसन यांची पहिली पत्नी, सासरे अतुल कसबे आणि अन्य नातेवाइकांचा विरोध होता. यावरून कुटुंबात वाद निर्माण झाला होता.

विवाहाच्या निर्णयावरून सुरू असलेला वाद पुढे अधिकच चिघळल्याची माहिती समोर आली आहे. किसन गडहिरे यांनी सासरे अतुल कसबे आणि मेव्हण्यावर तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे. याचदरम्यान मेव्हण्याचा पाठलाग सुरू असताना परिस्थितीने गंभीर वळण घेतले.

या वेळी अतुल कसबे यांनी किसन गडहिरे यांच्या डोक्यात दगड घातल्याचा आरोप आहे. त्यानंतर तलवारीने वार करून त्यांची हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. या हल्ल्यात किसन यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

विवाहाच्या निर्णयावरून सुरू झालेला कौटुंबिक वाद अखेर हत्येपर्यंत पोहोचल्याने मंगळवेढा तालुक्यात या घटनेची चर्चा सुरू आहे. या संघर्षाची नेमकी पार्श्वभूमी काय होती, हल्ला कोणत्या परिस्थितीत झाला आणि घटनेत सहभागी असलेल्या व्यक्तींची भूमिका काय होती, याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता आणि घटनेचा संपूर्ण घटनाक्रम पोलीस तपासातून स्पष्ट होणार आहे.

वरफळ आठ एकर ऊस जळून खाक; तीन तुषार संचही भस्मसात!

परतूर । प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील वरफळ येथे २५ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास आग लागून तीन शेतकऱ्यांचा एकूण आठ एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत तीन तुषार संचांचेही नुकसान झाले आहे. स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि अग्निशमन दलाच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र, तोपर्यंत ऊस पिकाचे मोठे नुकसान झाले होते. या घटनेमुळे बाधित शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून, तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

वरफळ येथील शेतकरी रमेश तुकाराम रूपनर (गट क्रमांक १९४), संपत बाबुराव शिंदे आणि मधुकर सखाराम शिंदे (गट क्रमांक १८४ व १८५) यांच्या शेतातील ऊसाला आग लागल्याने एकूण आठ एकरांवरील ऊस जळून खाक झाला. या आगीत तीन तुषार संचही जळून नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी आग विझविण्याचा प्रयत्न सुरू केले. त्यानंतर अग्निशमन दलानेही घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र, या घटनेत शेतकऱ्यांच्या उभ्या ऊस पिकाचे आणि सिंचन साहित्याचे मोठे नुकसान झाले.

ऊस पिकासाठी लागवड, खते, औषधे आणि मशागतीवर मोठा खर्च करावा लागतो. अशा परिस्थितीत उभे पीक आगीत जळून गेल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यातच तीन तुषार संचांचे नुकसान झाल्याने सिंचन व्यवस्थेवरही परिणाम झाला आहे.संबंधित महसूल व कृषी विभागाने घटनास्थळी भेट देऊन आठ एकर ऊस पिकाचा आणि तीन तुषार संचांच्या नुकसानीचा पंचनामा करावा. नुकसानीचे योग्य मूल्यांकन करून शासनाच्या नियमानुसार बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

मसाला उत्पादकांसह हॉटेल, फरसाण व्यावसायिकांवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

आगामी सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम तीव्र केली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील पिंपळनेर येथे दोन मसाला उत्पादक आस्थापनांवर छापे टाकून एक कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मसाला जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन्ही आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. दुसरीकडे, बीड जिल्ह्यातील एका हॉटेलसह फरसाण उत्पादक आस्थापनांवरही कारवाई करण्यात आली असून, त्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

पिंपळनेर येथील मे. जनता सेवा मिरची मसाला इंडस्ट्रीज आणि मे. अनोखे फूड्स अँड स्पाइसेस या दोन मसाला उत्पादक आस्थापनांची अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने तपासणी केली. या तपासणीत अस्वच्छता, मांजरी, कबुतरे आणि कीटकांचा वावर, कीटक नियंत्रणाच्या उपाययोजनांचा अभाव, कामगारांच्या वैद्यकीय तपासणीची नोंद नसणे, अन्नपदार्थ थेट जमिनीवर ठेवणे आणि अन्नपदार्थांच्या चाचणी अहवालांचा अभाव अशा गंभीर त्रुटी आढळून आल्या.

अन्नपदार्थांच्या उत्पादन प्रक्रियेत स्वच्छता आणि सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक असताना या त्रुटी आढळल्याने प्रशासनाने कठोर कारवाई केली. दोन्ही आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, एक कोटी रुपयांहून अधिक किमतीचा मसाला जप्त करण्यात आल्याची माहिती आहे.

बीड जिल्ह्यातील धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंबा येथील प्रसिद्ध हॉटेल मामा काठीयावाडीचा अन्न परवाना निलंबित करण्यात आला आहे. यापूर्वी प्रशासनाने सुधारणा करण्याबाबत नोटीस दिली होती. मात्र, त्यानंतर करण्यात आलेल्या फेरतपासणीतही त्रुटी कायम असल्याचे आढळले. हॉटेलमध्ये पिण्याच्या पाण्याचे प्रयोगशाळा प्रमाणपत्र उपलब्ध नसणे, स्वयंपाकघरात उघड्या कचराकुंड्या असणे आणि मुदत संपलेले अन्नपदार्थ आढळणे या कारणांमुळे प्रशासनाने परवाना

निलंबित करण्याची कारवाई केली.

बीड येथील औद्योगिक वसाहत परिसरातील पावळे नमकीन या फरसाण उत्पादक आस्थापनावरही अचानक तपासणी करण्यात आली. यावेळी अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळले. अन्नपदार्थांची अयोग्य साठवणूक, उघड्यावर साचलेला कचरा आणि तळण्यासाठी वापरण्यात आलेल्या तेलाची गुणवत्ता खालावल्याच्या त्रुटी निदर्शनास आल्या.

प्रशासनाने नमकीन, शेव आणि पापडीसह पाच अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेतले. तसेच १ हजार ४२२ किलो वजनाचा, १ लाख ३२ हजार ९४० रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला. या आस्थापनाचा अन्न परवाना तातडीने निलंबित करून उत्पादन आणि विक्रीस मनाई करण्यात आल्याची माहिती आहे.

बीड जिल्ह्यातील नेकनूर आणि ताडसोन्ना येथील खवा विक्रेत्यांवरही अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मिठाई, खवा, फराळाचे पदार्थ आणि खाद्यतेलाची मागणी वाढत असल्याने अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.

सणासुदीच्या काळात ग्राहकांना सुरक्षित अन्नपदार्थ मिळावेत आणि अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांना आळा बसावा, यासाठी तपासणी मोहीम सुरू आहे. या कारवायांमुळे अन्नपदार्थ उत्पादक, हॉटेल व्यावसायिक आणि फरसाण विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

जालना शहरात कचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर!

महापौर वंदना मगरे यांचा प्रभाग १, ६ आणि ७ मध्ये पाहणी दौरा

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील प्रभाग क्रमांक १, ६ आणि ७ मध्ये मागील काही दिवसांपासून घाण आणि कचऱ्याचे प्रमाण वाढल्याने नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. या समस्यांबाबत नागरिकांनी अनेक वेळा स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांकडे तोंडी तक्रारी करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने अखेर नागरिकांनी थेट महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे यांच्याकडे आपली व्यथा मांडली. नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेत महापौर वंदनाताई मगरे यांनी आज प्रभाग क्रमांक १, ६ आणि ७ मध्ये प्रत्यक्ष पाहणी दौरा केला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान प्रभागातील अनेक ठिकाणी घाण आणि कचरा साचल्याचे महापौरांच्या निदर्शनास आले. यावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत महानगरपालिका प्रशासनातील संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तातडीने कचरा उचलण्याचे तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचे कडक निर्देश दिले. नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी स्वच्छतेच्या कामात कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

दरम्यान, प्रभागातील काही भागांमध्ये पथदिवे बंद असल्याचेही महापौरांच्या निदर्शनास आले. आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते आणि परिसर प्रकाशमान असणे आवश्यक असल्याने त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना बंद पथदिवे तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या. सणासुदीच्या काळात नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महापौरांच्या या पाहणी दौऱ्यामुळे महानगरपालिका प्रशासनातील संबंधित अधिकारी आणि कर्मचारी कामाला लागल्याचे चित्र दिसून आले. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या स्वच्छतेच्या आणि पथदिव्यांच्या समस्यांवर आता तरी ठोस कार्यवाही होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, वारंवार तक्रारी करूनही समस्यांचे निराकरण होत नसल्याने नागरिकांनी थेट महापौरांकडे धाव घेतली होती. महापौर वंदनाताई मगरे यांनी नागरिकांच्या तक्रारींची सकारात्मक दखल घेत प्रत्यक्ष प्रभागात जाऊन पाहणी केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

युवकांना व्यसनमुक्तीचा संदेश देत देशभ्रमण करणारा अजय जालन्यात

जालना । प्रतिनिधी

जिद्द, चिकाटी आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर अशक्य वाटणारे ध्येयही गाठता येते, हा संदेश देत स्केटिंगद्वारे देशभ्रमण करणारे झारखंडमधील अजयकुमार विश्वकर्मा मंगळवार दि. २७ ऑक्टोबर रोजी जालन्यात दाखल झाले. आतापर्यंत सुमारे १९ हजार किलोमीटरचा प्रवास करून त्यांनी देशातील १९ राज्यांना भेट दिली आहे. जालन्यात त्यांनी ड. महेश धन्नावत यांची सदिच्छा भेट घेतली.

अजय विश्वकर्मा हे झारखंड राज्यातील कोडरमा जिल्ह्यातील डोमचांच प्रखंडातील फुलवरिया गावचे रहिवासी आहेत. आपल्या साहसी प्रवासादरम्यान त्यांनी देशातील विविध धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांना भेटी दिल्या. या प्रवासात त्यांनी १२ ज्योतिर्लिंगांसह चारधामचे दर्शन घेतले. स्केटिंगसारख्या माध्यमातून हजारो किलोमीटरचे अंतर पार करणे हे केवळ शारीरिक क्षमतेचेच नव्हे, तर मानसिक ताकद, शिस्त आणि सातत्याचेही प्रतीक मानले जात आहे.

तरुणांनी आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, व्यसनांसारख्या वाईट सवयींपासून दूर राहावे, तसेच धार्मिक, सामाजिक आणि विधायक कार्यांत सहभागी होऊन आपल्या भविष्याबाबत जागरूक राहावे, असा संदेश ते आपल्या प्रवासातून देत आहेत. विविध राज्यांतून प्रवास करताना धार्मिक स्थळांचे दर्शन घेण्यासोबतच भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

त्यांचे अनुभव युवकांना ध्येयाप्रती समर्पित राहण्याची आणि अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देणारे आहेत. केवळ स्वप्ने पाहून न थांबता मेहनत, शिस्त आणि चिकाटीने ती पूर्ण करावीत, याची आठवण करून देणारा हा उपक्रम असल्याची भावना ड. ड. महेश धन्नावत यांनी व्यक्त करत त्यांच्या देशभ्रमणातून सकारात्मक विचार, धार्मिक पर्यटन आणि सामाजिक जागृतीचा संदेश अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अंतरराष्ट्रीय अग्रवाल सम्मेलनच्या मराठवाडा विभागाच्या संयोजकपदी श्लोक अग्रवाल

जालना । प्रतिनिधी

अंतरराष्ट्रीय अग्रवाल सम्मेलन या संस्थेच्या मराठवाडा विभागाच्या संयोजकपदी जालना येथील श्लोक जगदीश अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेच्या कोलकाता येथील केंद्रीय मुख्यालयाने सोमवारी यासंबंधीचे अधिकृत नियुक्तिपत्र जारी केले. संस्थेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार मित्तल यांनी ही नियुक्ती केली. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रामचरण बंसल आणि प्रांतीय संघटन मंत्री सौ. शितल राजकुमार केडिया यांच्या अनुप्रेरणेने ही नियुक्ती करण्यात आली असून, समाजहितातील सक्रियता, अनुभव आणि अखंड निष्ठा लक्षात आपली नियुक्ती करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. श्लोक अग्रवाल यांनी जास्तीत जास्त सदस्यांना संस्थेशी जोडून मराठवाडा विभागात शहर व जिल्हा स्तरावर संघटनात्मक कार्यकारणी गठीत करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

अंतरराष्ट्रीय अग्रवाल सम्मेलन ही जगभरातील अग्रवाल समाजबांधवांना एका व्यासपीठावर आणण्याच्या दिशेने कार्यरत असलेली आंतरराष्ट्रीय संघटना आहे. प्रादेशिक, जिल्हा व शाखा स्तरावरील घटकांबरोबरच महिला शक्ती, युवा शक्ती आणि उपसमित्यांच्या माध्यमातून संस्था समाजाला संघटित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. या महत्त्वपूर्ण जबाबदारीच्या माध्यमातून श्लोक अग्रवाल यांची सक्रियता, सहकार्य व पाठबळ संघटनेला नवी कार्यक्षमता व ऊर्जा देईल, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला आहे.

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना श्लोक अग्रवाल म्हणाले की, अंतरराष्ट्रीय अग्रवाल सम्मेलनाने टाकलेला हा विश्वास माझ्यासाठी अत्यंत सन्मानाचा क्षण आहे. राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार मित्तल, प्रदेश अध्यक्ष रामचरण बंसल आणि प्रांतीय संघटन मंत्री सौ. शितल केडिया यांचा मी आभारी आहे. मराठवाड्यातील प्रत्येक शहर व जिल्ह्यात संघटन वाढवून समाजबांधवांना एकत्र आणण्यासाठी पूर्ण निष्ठेने प्रयत्न करू. महिला व युवा शक्तीला संघटनेत अधिकाधिक सहभागी करून घेण्यावर माझा भर राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल चे निरीक्षक म्हणून डॉ. कैलाश सचदेव यांची नियुक्ती

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल चे निरीक्षक म्हणून डॉ. कैलाश सचदेव, वरिष्ठ पॅथॉलॉजिस्ट यांची 'हिस्टोडर्मा २०२६' या राज्यस्तरीय पॅथॉलॉजी परिषदेसाठी नियुक्ती करण्यात आली होती. ही परिषद २४ व २५ ऑक्टोबर २०२६ रोजी गखखण मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

त्वचारोगशास्त्र व त्वचारोग ऊतकशास्त्र या विषयांवर आधारित या दोन दिवसीय राज्यस्तरीय परिषदेत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. परिषदेच्या व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून गखखण मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अझहर अहमद सिद्दीकी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजीनगरचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या अध्यक्षपदासाठी निवड झालेले डॉ. उज्वला दहिफळे, गखखण चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इलियास तसेच वैद्यकीय अधीक्षक डॉ. फातिमा इशरत उपस्थित होते.

या परिषदेत राज्यभरातून १८८ प्रतिनिधी व पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थी डॉक्टरांनी सहभाग नोंदविला. विविध व्याख्याने, शैक्षणिक सत्रे आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे सहभागी डॉक्टरांना वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त करण्याची संधी मिळाली.

डॉ. कैलाश सचदेव यांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे निरीक्षक म्हणून झालेली नियुक्ती ही त्यांच्या प्रदीर्घ वैद्यकीय अनुभवाची व पॅथॉलॉजी क्षेत्रातील योगदानाची महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे. दोन दिवस चाललेल्या या परिषदेचा समारोप उत्साहात झाला.

चौकशी अहवालानंतरही कारवाई नाही; दिव्यांग कार्यकर्त्याचे उद्यापासून आमरण उपोषण!

जालना । प्रतिनिधी

जिल्हा परिषद, जालना येथील बांधकाम विभागातील कथित अनियमितता आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चौकशी अहवालानंतरही कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ दिव्यांग सामाजिक कार्यकर्ते विलास महादेव वाघमारे हे गुरुवार, २९ ऑक्टोबरपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर अर्धनग्न आमरण उपोषणाला बसणार आहेत. दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर आराखड्याबाहेरील कामांना प्रशासकीय मान्यता, कामवाटपातील कथित अनियमितता, निकृष्ट कामे आणि प्रत्यक्षात न झालेली कामे पूर्ण दाखविल्याच्या आरोपांची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करा!

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे हे कथित गैरप्रकारांचे मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप वाघमारे यांनी केला आहे. त्यांच्या कार्यकाळातील प्रशासकीय मान्यता, कामवाटप, निधीचा विनियोग आणि निर्णयप्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अभिलेख सुरक्षित ठेवून सर्वंकष चौकशीची मागणी

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकाने चौकशी केली असून, त्यातून अनियमितता समोर आल्याचे वाघमारे यांचे म्हणणे आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याचा त्यांचा आरोप आहे. प्रशासकीय, वित्तीय, तांत्रिक आणि प्रयोगशाळाविषयक बाबींची तपासणी करून कामांची प्रत्यक्ष स्थळपडताळणी करावी. मोजमाप पुस्तिका, देयके, गुणवत्ता अहवाल, डिजिटल पुरावे आणि मूळ संचिका सुरक्षित ठेवून आवश्यकतेनुसार जप्त कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

माहिती अधिकारातील अर्ज प्रलंबित

सन २०२४ पासून माहिती अधिकारांतर्गत अर्ज आणि प्रथम अपिले दाखल करूनही अपेक्षित माहिती मिळाली नसल्याचा आरोप वाघमारे यांनी केला आहे. प्रलंबित अर्जांवर निर्णय घेऊन संबंधित अभिलेखांच्या प्रमाणित प्रती द्याव्यात, अशी त्यांची मागणी आहे.

उपोषणादरम्यान दिव्यांग व्यक्तीसाठी सुलभ शौचालय, स्नानाची व्यवस्था, विश्रांतीची जागा आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

चौकशी अहवालानंतर कारवाई का नाही आणि जनतेच्या पैशांचा हिशेब कोण देणार, असे सवाल उपस्थित करत वाघमारे यांनी २९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

संक्षिप्त

आपली फलटण मॅरेथॉनमधून आरोग्य, व्यायाम, निसर्गसंवर्धनाचा संदेश

फलटण । प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध कास पठारावर युरोपियन नीलकंठ (युरोपियन रोलर) या आकर्षक स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन झाले आहे. पर्यावरण अभ्यासक गणेश सातव यांनी या पक्ष्याची नोंद केली असून, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे वरिष्ठ प्रोग्राम ऑफिसर नंदकुमार दुधे यांनी त्याची ओळख निश्चित केली. या दुर्मिळ निरीक्षणामुळे कास पठारावरील समृद्ध पक्षीवैविध्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

कास पठार रंगीबेरंगी रानफुले, दुर्मिळ वनस्पती आणि समृद्ध जैवविविधतेसाठी जगभर प्रसिद्ध आहे. पश्चिम घाटाचा युनेस्कोच्या जागतिक नैसर्गिक वारसास्थळांच्या यादीत २०१२ मध्ये समावेश झाला. त्यामुळे कास पठार आणि परिसराला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

युरोपियन नीलकंठाचे शास्त्रीय नाव कोरॅसियस गॅर्युलस असे आहे. युरोप आणि मध्य आशियातील प्रदेशांत प्रजनन करणारा हा पक्षी हिवाळ्यात आफ्रिकेकडे स्थलांतर करतो. स्थलांतराच्या प्रवासादरम्यान भारतातील विविध भागांतही त्याचे दर्शन घडू शकते.

निळसर-फिरोजी रंगाचे शरीर आणि तांबूस-तपकिरी पाठ ही या पक्ष्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्याच्या आकर्षक रंगसंगतीमुळे पक्षी निरीक्षक आणि निसर्गप्रेमींसाठी तो विशेष आकर्षण ठरतो. कास पठारावरील या नोंदीमुळे परिसरातील जैवविविधतेचा अभ्यास आणि संवर्धनाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.ली फलटण मॅरेथॉनच्या माध्यमातून डॉ. प्रसाद जोशी व डॉ. प्राची जोशी यांनी लोकांना नियमित व्यायामाचे महत्त्व पटवून देण्यासाठी केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. या उपक्रमातून निसर्गसंवर्धन आणि अवयवदान चळवळीला मिळणारी चालना महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केले.

जोशी हॉस्पिटल प्रा. लि., फलटणतर्फे आयोजित आपली फलटण मॅरेथॉन २०२६ च्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अभिनेते समीर धर्माधिकारी, अपर्णा धर्माधिकारी, आमदार सचिन पाटील, श्रीमंत सुभद्राराजे नाईक निंबाळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

चुकीच्या जीवनशैलीमुळे वाढणारे आजार रोखण्यासाठी योग्य आहार आणि नियमित व्यायाम आवश्यक आहे. नागरिकांनी आरोग्य जपण्यासाठी व्यायामाची सवय अंगीकारावी, असे आवाहन निंबाळकर यांनी केले. यावेळी त्यांनी स्वतः अवयवदानाचा ऑनलाइन अर्ज भरून समाजासमोर आदर्श ठेवला.

मॅरेथॉनमध्ये २१, १०, ५ आणि ३ किलोमीटरच्या विविध प्रकारांत सुमारे दोन हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला. विजेत्यांना एकूण ७२ पारितोषिके प्रदान करण्यात आली.

कास पठारावर दुर्मिळ युरोपियन नीलकंठाचे दर्शन

फलटण । प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध कास पठारावर युरोपियन नीलकंठ (युरोपियन रोलर) या आकर्षक स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन झाले आहे. पर्यावरण अभ्यासक गणेश सातव यांनी या पक्ष्याची नोंद केली असून, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे वरिष्ठ प्रोग्राम ऑफिसर नंदकुमार दुधे यांनी त्याची ओळख निश्चित केली. या दुर्मिळ निरीक्षणामुळे कास पठारावरील समृद्ध पक्षीवैविध्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

कास पठार रंगीबेरंगी रानफुले, दुर्मिळ वनस्पती आणि समृद्ध जैवविविधतेसाठी जगभर प्रसिद्ध आहे. पश्चिम घाटाचा युनेस्कोच्या जागतिक नैसर्गिक वारसास्थळांच्या यादीत २०१२ मध्ये समावेश झाला. त्यामुळे कास पठार आणि परिसराला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

युरोपियन नीलकंठाचे शास्त्रीय नाव कोरॅसियस गॅर्युलस असे आहे. युरोप आणि मध्य आशियातील प्रदेशांत प्रजनन करणारा हा पक्षी हिवाळ्यात आफ्रिकेकडे स्थलांतर करतो. स्थलांतराच्या प्रवासादरम्यान भारतातील विविध भागांतही त्याचे दर्शन घडू शकते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**